PDF Compressor Free Version



महेंद्र पेडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
दर रविवार – दालबाटी, चुरमा
(रेल्वे पार्सल सुविधा)
किटी पार्टी, बर्थ डे पार्टी
करिता ५० जणांची उत्तम व्यवस्था
(आमरस – ४००/– रु. किलो मिळेल)
कापड बाजार,
कोहिनूर शेजारी, अ. नगर



RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR



उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...

सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !



■ Volume - 72 ■ Issue- 203 ■ Marathi Daily ■ Friday 19/4/2024 ■ Pages - 6 ■ Price- Rs. 3



## संपूर्ण लग्नबस्ता खरेदीचे एकमेव पसंतीचे ठिकाण!

विवाहासोबत जीवनाच्या नव्या पर्वात पदार्पण करतांना नाविन्यपूर्ण वस्त्र खरेदीचा खरा आनंद येतो तो पेशवाई-श्रीमंत मध्येच! नववधू-नवरदेवासाठी तसेच संपूर्ण वऱ्हाडी मंडळी साठी सुध्दा अत्युत्तम पोशाख, संपूर्ण लग्न बस्ता, लेहेंगा, मानपानाच्या साड्या, सुटिंग, शर्टींग सह ॲक्सेसरीज पर्यंत सर्व काही एकाच ठिकाणी!



## अस्सल पारंपारिक पोशाख!

पैठणी | पारंपारिक सारिज | डिझायनर सारिज | घागरा
ब्रँडेड रेडीमेड्स | सूटिंग | शर्टिंग | एथनिक | ॲक्सेसरीज

पेशवाई | श्रीमंत

सर्जेपुरा, अहमदनगर. | कुमठेकर रस्ता, पुणे.

लग्न बस्त्याची खास सोय.

अ. नगर : 0241 2325002 / 3 / 4
पुणे : 020 2445 3730

Scan our latest collection
@PESHWAISHRIMANT

/peshwaishrimant

पार्किंग सुविधा उपलब्ध.

संपादकीय

# पावसाचा दिलासा

देशाला यंदा चांगल्या पावसाचे आशेचे ढग दिसायला लागले आहेत. भूगर्भातील पाण्याची घटलेली पातळी, धरणांची खपाटीला गेलेली पोटे, कोरड्याठाक नद्या, विहिरींनी गाठलेला तळ अशा परिस्थितीत भारनियमानाचे भूत मानगुटीवर बसलेले. अंगाची लाही लाही करणाऱ्या या काळात गार हवेची एक झुळूक यावी, तसे झाले आहे. स्कायमेट ही प्रसिध्द संस्था आणि आता भारतीय हवामान विभागाने या वर्षी चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने शेतकऱ्यांनाच आनंद होणार आहे, असे नाही तर रिझर्व्ह बँक आणि सरकारलाही सुटकेचा नि:श्वास टाकल्यासारखे झाले आहे. गेल्या वर्षभरात पाऊस कमी असल्याने शेती उत्पादनावर, अर्थव्यवस्थेवर, आयात-निर्यातीवर आणि एकूणच बाजारातील मागणी-पुरवठ्यावर कसा आणि किती परिणाम झाला, हे सध्या अनुभवायला मिळत आहे. ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर आणि वस्तूंच्या मागणीतील घट हे कमी पावसाचे कारण आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेवर आणि महागाईवर कमी पावसाचा परिणाम होत आहे. सरकार आणि रिझर्व्ह बँक बाजारात हस्तक्षेप करून महागाई नियंत्रणाला प्राधान्य देत असले, तरी त्याचा पावसाशी संबंध असतो. पाऊस नसल्यास शेतीमालाच्या उत्पादनावर आणि एकूणच ग्रामीण अर्थकारणावर परिणाम होत असतो. सरकारला टँकर, चारा, कर्जवसुलीमध्ये सवलत आदिंची उपाययोजना करावी लागते. बँका, पतसंस्थांच्या वसुलीवर परिणाम होतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतात. कर्जाचा डोंगरही वाढतो. अशा परिस्थितीत भारतातील ८० टक्के सिंचन व्यवस्था ज्या मोसमी पावसावर अवलंबून असते, त्याच्याकडे नजरा लागल्या नाहीत, तरच नवल.एप्रिलमध्ये भारतीय हवामान विभाग, स्कायमेट आणि अन्य हवामानतज्ज्ञांचा दीर्घकालीन अभ्यासावर बेतलेला अंदाज व्यक्त होत असतो. अर्थातच हा फक्त अंदाज असतो. सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असला, तरी तो किती काळात होणार, त्याचे दिवस किती असतील, दोन पावसांमध्ये किती अंतर असेल, यावर शेतीची गणिते अवलंबून असतात. भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या दीर्घकालीन हवामान अंदाजानुसार यंदा संपूर्ण देशभरात नैऋत्य मान्सूनच्या काळात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यंदा सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. एल निनो आणि ला निनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा अंदाज घेऊन हवामान विभागाने हे दीर्घकालीन अंदाज जाहीर केले आहेत. एल निनो कमकुवत होत असून, ला निना येत असल्याने पावसावर त्याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. हवामान विभागाकडे असलेल्या सुमारे ७० वर्षांच्या आकडेवारीचा सविस्तर अभ्यास करून भारतीय हवामान विभाग चांगल्या पावसाच्या अंदाजाच्या निष्कर्षापर्यंत पोचला असला तरी अनेकदा हवामानात अचानक बदल होत असतो, वादळे येत असतात आणि जगात कुठेही कमी दाबाचा पट्टा तयार झाला तर पावसाळी ढग खेचले जाऊन पावसावर परिणाम होत असतो. सध्या एल निनोची स्थिती काहीशी जास्त (मॉडरेट) आहे; पण त्याचा प्रभाव हळुहळू कमी होत आहे. मान्सून सुरू होईप्रर्यंत तो अगदी कमी (न्यूट्रल) स्थितीला येऊ शकतो. तेव्हापासून म्हणजे ऑगस्ट-सप्टेंबरच्या आसपास ला निना स्थिती निर्माण होऊ शकते. एल निनोचा मान्सूनवर नकारात्मक परिणाम होत असला तरी ला निनाच्या स्थितीचा पावसावर सकारात्मक परिणाम होतो.यंदा २१ मे रोजी मान्सून अंदमान निकोबारमध्ये पोहोचण्याची दाट शक्यता आहे. राज्यात जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून येणार असून जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पेरणीयोग्य पाऊस झालेला असेल, असा अंदाज आहे. हवामान विभागाने जाहीर केलेल्या अंदाजात महाराष्ट्रातील बहुतांश भागात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम विदर्भात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता जास्त आहे. पूर्व विदर्भासह इतर भागात सरासरीएवढ्या पावसाची शक्यता जास्त आहे. पूर्व विदर्भातील पावसाबाबत या अंदाजामध्ये स्पष्टता नाही. केरळमध्ये मान्सूनचे आगमन १५ मेपर्यंत होऊ शकते, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. चांगल्या पावसामुळे महागाई ०.५ टक्के घटेल. महागाई नियंत्रित राहिली तर रिझर्व्ह बँक व्याजदर कमी करू शकेल. गृहकर्ज, वाहन कर्जाचे दर कमी होऊ शकतील. देशांतर्गत मागणी वाढेल. त्याचा फायदा एफएमसीजी, फर्टिलायझर, औषधाशी संबंधित कंपन्यांना होईल.या वर्षी ईशान्येला किंवा जम्मू काश्मीर, लडाख, हिमाचल, उत्तराखंडमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. ओडिशा, छत्तीसगड झारखंडचा काही भाग, पश्चिम बंगाल इथेही सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. गेल्या वर्षीपर्यंत नोव्हेंबर ते मार्चदरम्यान महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गारपीट व्हायची; पण या वर्षी तसे न घडता एप्रिल महिन्यात गारपीट झाली आणि येत्या काही दिवसांमध्येही गारपीट होऊ शकते. या संपूर्ण स्थितीचा विचार करता महाराष्ट्रात यंदा मान्सूनच्या पावसाबरोबरच मान्सूनपूर्व आणि परतीचा पाऊसही चांगला होण्याची शक्यता आहे.

## टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत राहुरीच्या संघाला विजेतेपद



**समाचार/नगर-दि.१९**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे) व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय (अमरावती) तसेच टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन (महाराष्ट्र) यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सुरू असलेल्या शासकीय राज्य शालेय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय कृषी विद्यापीठ राहुरीच्या मुलींच्या संघाने राज्यात विजेतेपद पटकावले. १७ वर्षे वयोगट आतील मुलींच्या संघाने सर्वोत्तम कामगिरी करून मुंबई विभाग, नागपूर विभाग, कोल्हापूर विभाग व अंतिम सामन्यात अमरावती विभागाचा ३० धावांनी पराभव करून प्रथम क्रमांक पटकाविला. या संघाची राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघाला शाळेचे क्रीडाशिक्षक व क्रिकेट प्रशिक्षक घनश्याम सानप तसेच टेनिस बॉल जिल्हा संघटनेचे सचिव अविनाश काळे यांनी मार्गदर्शन केले. या संघात कर्णधार म्हणून संतोषी भिसे, उपकर्णधार मृणाल ननवरे, श्रेया सोनवणे, नशरा सय्यद, राशी पवार, प्रणाली पानसंबळ, लक्ष्मीप्रिया म्हसे, श्रावणी अडसुरे, आकांक्षा सातदिवे, अमृता ढगे, श्रद्धा खंडागळे या विद्यार्थिनींचा समावेश होता.

## सुषमा आव्हाड हिचा पांगरमल ग्रामस्थांतर्फे सत्कार



**समाचार/नगर-दि.१९**

कोणतेही यश सहजा-सहजी मिळत नसते. त्यासाठी जिद्द, अथक परिश्रमाची गरज असते. ध्येय निश्चित असेल, हेतू चांगला असेल तर त्यास परमेश्वराचीही साथ मिळत असते. आज पोलिस उपनिरिक्षक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या सुकन्या सुषमा आव्हाड यांना समाजाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. पदाच्या माध्यमातून जनतेची सेवा करावी. समाजातील वाईट प्रवृत्तीचा नायनाट करुन चांगल्या समाज निर्मितीसाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन हभप आदिनाथ महाराज शास्त्री यांनी केले.

पांगरमल येथील सुषमा आव्हाड यांनी पीएसआय परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तारकेश्वर गडाचे सद्गुरु आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी हभप ज्ञानेश्वर महाराज जळकेश्वर, डीवायएसपी अरुण आव्हाड, भगवानबाबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष भीमराज आव्हाड, पांगरमलचे सरपंच अमोल आव्हाड, तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

भिमराज आव्हाड यांचे भाषण झाले. सत्कारास उत्तर देतांना सुषमा आव्हाड म्हणाल्या, मनात जिद्द, ध्येय ठेवून खूप परिश्रम घेऊन ही परिक्षा उत्तीर्ण झाले. आज आई-वडिलांचे स्वप्न पुर्ण झाल्याचे समाधान आहे. गावकर्यांनी माझा केलेला सत्काराने मला प्रोत्साहन मिळणार असल्याचे सांगितले.

# जॉनी गद्दार

## सुहाना सफर...




हल्ली बऱ्याचशा चित्रपटांचे रिमेक पहायला मिळतात पण या चित्रपटाचा अजून रिमेक आला नाही. बरेचजणांना रिमेक करायचा होता, पण नायकाच्या फॅन्सना मंजूर नव्हतं, त्यांनी नायकाला गळ घातली, याचा रिमेक नको, कारण ओरिजनलची जादू पुन्हा साधली जाईलच असं नाही आणि नायकाने सुद्धा आपल्या फॅन्सना मान देत रिमेक नाही केला. अर्थात यातील बऱ्याच सीन्सचे रिमेक झालेत. यातील नायक आणि त्याचा लहानपणी हरवलेला भाऊ जेंव्हा फाईटसीनमध्ये बॉक्सिंगपंच एकमेकांना लगावतात तेंव्हा त्यांना त्या पंचेसमुळे आपण लहानपणी हरवलेले सख्खे भाऊ आहोत याचा साक्षात्कार होतो. अगदी असाच सीन,' काला धंदा गोरे लोग', (१९८६) चित्रपटात, संजय खान आणि अकबर खान यांच्यामध्ये घडलेला दाखवला आहे.

मागच्या लेखात आपण पाहिलं की गुलशन ने दिग्दर्शकावर विश्वासघाताचा आरोप केला. त्याबद्दल थोडंसं.

झालं असं की, गुलशन ने या चित्रपटानंतर दिग्दर्शकाला पुन्हा कुठल्याच प्रोजेक्टमधे रिपीट केलं नाही ही खरंतर खूपच आश्चर्याची गोष्ट होती. गुलशन पेक्षा दिग्दर्शक खूपच मोठा होता, अतिशय लहान वयात त्याने खूपच मोठी कामगिरी केली होती आणि १९७० सालचा सगळ्यात मोठा चित्रपट देऊनही गुलशन आणि दिग्दर्शक पुन्हा कधी एकत्र आले नाहीत याला दिग्दर्शकाचा आडमुठा आणि हेकट स्वभाव, असं गुलशन च म्हणणं. दिग्दर्शक कोणाच्याच आणि कोणत्याच सूचना ऐकण्याच्या मन:स्थितीत नसे. गुलशन ने त्यामुळे पुढचे बरेचसे चित्रपट यश चोपडा यांच्यासोबत केले. पण गंमतीचा भाग म्हणजे त्याला यशजी आपल्या दिग्दर्शकाइतके कधीच जवळचे वाटले नाहीत. तरीही त्यांनी आपल्या दिग्दर्शकाला कधीच पुढचे चित्रपट दिले नाहीत. धरलं तर चावतंय अन सोडलं तर पळतंय अशी अवस्था.

चित्रपटाचा पहिला क्लायमॅक्स गुलशन च्या मते खूपच पांचट होता. त्याने दिग्दर्शकाला रिशूट करायला सांगितलं. दिग्दर्शकाने त्याला धुडकाऊन लावलं. पण सगळ्यांनी गुलशन च म्हणणं लाऊन धरल्याने दिग्दर्शकाचा नाईलाज झाला आणि त्याने पुन्हा नव्याने क्लायमॅक्स लिहिला आणि तो सगळ्यांनाच आवडला. दिग्दर्शकाच्या हेकटपणामुळे गुलशन ने जोशीला, या आगामी चित्रपटासाठी यशजींना साईन केलं कारण यशजी गुलशन च ऐकत असत आणि तेही नुकतेच बी आर चोपडा यांच्यापासून फारकत घेत एक स्वतंत्र दिग्दर्शक म्हणून पुढे येत होते. जेंव्हा आपल्या दिग्दर्शकाला हे समजलं तेंव्हा त्याची तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याने गुलशन कडे मानधन म्हणून सहा लाख रुपयांची आवास्तव मागणी केली. दिग्दर्शकाला शेवटचं मानधन दीड-लाख मिळालं होतं आणि गुलशन ने त्याला दोन लाख द्यायचं ठरवलं होतं. पण सहा लाख ही १९७० सालात कायच्याकाय मागणी होती. तरीही गुलशन ने दिग्दर्शकाची मागणी पुरी केली आणि पुन्हा त्याचं तोंड पाहिलं नाही.

अरे हो, तो दिग्दर्शक- गोल्डी आनंद, आणि चित्रपट, देव आनंद अभिनित,' जॉनी मेरा नाम'.

बारीक-सारीक: ओ मेरे राजा, गाण्याच्यावेळी, देव साहेब आणि हेमा मालिनी, पॉवर गेल्याने स्काय ट्रॉली मधे अडकले, तेंव्हा बराच वेळ हेमा मालिनी यांना, देव साहेबांच्या कुशीत बसावं लागलं. त्यांच्यासाठी तो फारच विचित्र अनुभव होता.

**- देवाशिष शेडगे**
**मो.८८०६०४४४८६**




## राशीभविष्य

- **मेष** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. आर्थिक बाबतीत तडजोड करावी. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : व्यवसायात विचारपूर्वक पावलं टाका. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. प्रवास शक्यतो टाळावा.
- **मिथुन** : कामं रखडतील. उष्णतेच्या विकाराचा त्रास संभवतो. नोकरीत इतरांशी जमवून घ्यावं.
- **कर्क** : कामाचा उत्साह वाढता राहील. अनावश्यक खर्च होईल. गंतवणुकीबाबत सबुरीचं धोरण ठेवावं.
- **सिंह** : आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं. ज्येष्ठांच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. विचाराने रहायला हवं.
- **कन्या** : अनपेक्षित घटना चिंता वाढवतील. व्यवसायात अडचणी येतील. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल.
- **तूळ** : कुठल्याही आमिषाला भुलू नका. प्रत्येक बाबतीत जागरूक रहावं. गैरसमज वेळीच दूर करावे.
- **वृश्चिक** : रखडलेली कामं मार्गी लागतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. मुलांच्या कलांना वाव मिळेल.
- **धनु** : किरकोळ बाबींचा फार विचार करू नये. निर्धाराने वाटचाल सुरू ठेवावी. बाकी समाधान लाभेल.
- **मकर** : सरकारी कामं रखडतील. प्रवासाचे बेत लांबणीवर पडतील. भावंडांचं उत्तम सहकार्य मिळेल.
- **कुंभ** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. कर्ज प्रकरणाबाबत दिलासा मिळेल. आर्थिक प्राप्ती उत्तम राहील.
- **मीन** : बोलण्यातून गैरसमज संभवतात. सबुरीचं धोरण ठेवावं. घरात पाहुण्यांची ये-जा राहणार आहे.

## दिन विशेष

**२० एप्रिल**

- **२०१५** : युरोपला स्थलांतर करणाऱ्यांच्या बोटीला जलसमाधी मिळाल्याने ९५० पेक्षा अधिक लोकांना जलसमाधी.
- **२०१६** : भाजपा आमदाराच्या हल्ल्यात जखमी झालेल्या 'शक्तिमान' या घोड्याने अखेरचा श्वास घेतला.
- **२०१७** : ख्यातनाम लेखक-संशोधक आणि नाटककार प्रा.रामनाथ चव्हाण यांचे निधन.
- **२०१८** : नरोडा-पाटिया दंगल प्रकरणी माया कोडनानी दोषमुक्त.

आरोग्यमंत्र

## भरपूर प्या पाणी

शरीराच्या गरजेनुसार पाणी प्यावं हे खरं असलं तरी उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यायला हवं. कारण पाण्याच्या कमतरतेमुळे अनेक विकार आणि समस्या उद्‌भवू शकतात. या धर्तीवर कमी पाणी प्यायल्याने होणारे दुष्परिणाम आणि पाणी पिण्याच्या गरजेविषयी जाणून घेऊ या.



✼ पाण्याच्या कमतरतेमुळे डिहायड्रेशन, उच्च रक्तदाब, जंतूसंसर्ग यासारख्या समस्या निर्माण होतात. पचनशक्तीवरही परिणाम होतो. डोकेदुखी, अंगदुखी, थकवा यांसारख्या तक्रारी निर्माण होतात. हे टाळण्यासाठी भरपूर पाणी प्यावं. पाण्यामुळे शरीराचं तापमान नियंत्रणात राहतं. ✼ विशेषत: महिलांनी जास्त पाणी प्यायला हवं. महिलांना मूत्रमार्गाशी संबंधित विकार होण्याची शक्यता अधिक असते. गरोदर तसंच स्तनपान करवणाऱ्या स्त्रियांनाही अधिक प्रमाणात पाणी पिण्याची गरज असते. यूरिया, सोडियम, पोटॅशियम यासारखे विषारी घटक शरीराबाहेर टाकण्यात पाण्याचा महत्त्वाचा वाटा असतो. तसंच चयापचय क्रिया, पचनक्रिया सुरळीत सुरू राहावी तसंच पोषक घटक शरीरात योग्य पद्धतीने शोषले जावे यासाठी पाण्याची गरज असते. ✼ उन्हाळ्यात त्वचा कोरडी होते. पाण्याच्या कमतरेमुळेही ती निस्तेज दिसू लागते. त्यामुळे या काळात भरपूर पाणी प्यायला हवं. पाण्यामुळे त्वचेतला ओलावा टिकून राहतो आणि सौंदर्य खुलतं. उन्हाळ्यात आहारातही द्रवपदार्थांचं सेवन वाढवायला हवं. त्याचे बरेच लाभ अनुभवायला मिळतात.


महत्त्वपूर्ण काही

## इथे नाही गुरुत्वाकर्षण

गुरुत्वाकर्षणाचा शोध न्यूटनने लावला. या गुरुत्वाकर्षणामुळेच आपण चालू शकतो. सगळ्या वस्तू जिथल्या तिथे रहातात. चेंडू वरून खाली येतो. पण हे गुरुत्वाकर्षण नसतं तर... वस्तू हवेत तरंगत राहिल्या असत्या. पृथ्वीवरच्या काही ठिकाणी शून्य गुरुत्वाकर्षण आहे. अशा ठिकाणी भन्नाट काहीतरी घडत असतं. ✼ लेहमध्ये मॅग्नेटिक हिल नावाचं ठिकाण आहे. लेह ते कारगिल रस्त्यावरच्या फक्त ३० किलोमीटरच्या या भागात गुरुत्वाकर्षण नाही. या रस्त्यावर चढ आहे. इथे वाहन आपोआप पुढे जातं. इथल्या चुंबकीय लहरींमुळे असं होत असल्याचं म्हटलं जातं. ✼ अमेरिकेतल्या रॅपिड सिटीमध्ये कॉसमॉस मिस्ट्री एरिया आहे. इथली काही झाडं विचित्र पद्धतीने झुकल्याचं पहायला मिळतं. इथे चेंडू खाली नाही तर वर जातो. ✼ अमेरिकेतल्याच कॅलिफोर्नियामध्ये एक ठिकाण आहे. हे ठिकाण पर्यटन स्थळ बनून गेलं आहे. या भागात पाणी वरच्या दिशेने वाहताना दिसतं. इथे तुम्ही खाली पडत नाही. वस्तूंचे आकार बदलतात.

सल्ला मोलाचा

## खरेदी हिऱ्याच्या दागिन्यांची



लग्नप्रसंगी हिऱ्याचे दागिने घेतले जातात. मात्र हे दागिने घेताना नीट लक्ष द्यायला हवं. अन्यथा, फसवणूक होण्याची शक्यता असते. हिऱ्याचे दागिने सेलमध्ये घेऊ नका. सवलतीत मिळणाऱ्या दागिन्यांमधले हिरे बनावटही असू शकतात तसंच कमी दर्जाचे हिरे दिले जाऊ शकतात. हिऱ्याची खरेदी करण्याआधी बजेट ठरवा. अन्यथा, हिऱ्यांची खरेदी महाग पडू शकते. हिऱ्याच्या दागिन्यांचा विमा करून घ्या. हिऱ्याच्या आकारानुसार त्याची किंमत ठरते. त्यामुळे याबाबत माहिती करून घ्या. लहान आकाराच्या हिऱ्याची किंमत मोठ्या हिऱ्याच्या तुलनेत कमी असते. हिऱ्याचा आकार सारखा असला तरी त्याचं वजन कमी-जास्त असू शकतं. या सगळ्या बाबींचा विचार करून मगच हिऱ्याच्या दागिन्यांची खरेदी करा.

## पंचांग

**शनिवार, २० एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. १२, नक्षत्र : पूर्वा
चंद्रराशी : सिंह, ध्रुव योग
सूर्योदय: ०६.२०, सूर्यास्त: ६.५५

## फॉरवर्डस

**प्रेमी जीवांमधलं हे अद्वैत खरचंच खूप रम्य असतं...**

तेरी ही किस्से, तेरी कहानियाँ
मिलेंगी मुझ में
न जाने किस-किस अदा से तू
आबाद हैं मुझ में।

टेक्नो टॉक



सध्याच्या धकाधकीच्या काळात मानसिकदृष्ट्या सक्षम असणंही गरजेचं आहे. मेंदूचा फिटनेस राखणारी काही ॲप्स आहेत. फॅब्युलस हे ॲप तुमच्या प्रत्येक कृतीवर लक्ष ठेवतं. त्यानुसार तुमच्या मेंदूवर येणाऱ्या ताणाची माहिती देतं. हा ताण कमी करण्यासाठी काय करायला हवं हेही सांगतं. काल्म नावाचं एक ॲप आहे. या ॲपमध्ये शांततेसाठी ध्यानधारणेच्या पद्धती सांगण्यात आल्या आहेत. धीम्या संगीताची जादूही तुम्ही अनुभवू शकता.

करिअरवाटा

## ॲक्वेरियम उभारणीसाठी...

मोठा सागरी किनारा लाभलेल्या आपल्या देशात मत्स्योत्पादन मोठ्या प्रमाणावर होतं. मत्स्यालय (ॲक्वेरियम) निर्माण करण्यासाठी माशांचा सांभाळ करणं हा एक चांगला व्यवसाय आहे. मात्र, या व्यवसायाच्या सविस्तर अभ्यासाविषयी अभ्यासक्रम उपलब्ध नाहीत. अर्थात उपलब्ध अभ्यासक्रमात सागरविज्ञानाचा अभ्यास करताना माशांविषयी माहिती मिळू शकते. परंतु याच्या जोडीला मत्स्यालय निर्माण करण्यासाठी लागणारं विशेष ज्ञान प्राप्त होणंही गरजेचं ठरतं. त्यादृष्टीने या क्षेत्रात माहितीच्या प्रसाराला वाव आहे. यामुळेच या संदर्भात प्रशिक्षण तसंच मार्गदर्शनाच्या सुविधा उपलब्ध होणं गरजेचं आहे. जपानच्या ॲक्वा डिझाईन अमॅनो (एडीए) या संस्थेनं ही सोय केली आहे. मत्स्यालय उभं करण्यासाठी लागणारी सगळी सामग्री, मासे, भांडे, पाणवनस्पती, माशांचे खाद्य, औषधे या साऱ्यांची निर्मिती, विक्री करणाऱ्या दुकानांचं जाळं संस्थेनं जगभर उभं केलं आहे. आपल्या देशातही काही ठिकाणी ही सुविधा उपलब्ध आहे. तिथं ॲक्वेरियमचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांना आवश्यक माहिती उपलब्ध होऊ शकेल. पर्यटनस्थळांच्या ठिकाणी ॲक्वेरियम उभारणं हा चांगला व्यवसाय होऊ शकतो.



खेचाखेची

## कर की...

**पत्नी** : अहो, ऐकलं का. उठा आता. मी पोळ्या लाटायला सुरूवात केली आहे.

.
.
.
.
.
.
.
.

**पती** : मग कर की. मी कुठे तव्यावर पसरलो आहे!

वेगळं काही

नायजेरियामध्ये 'इग्बो ओरा' नावाचं शहर आहे. या शहराला जुळ्या मुलांची राजधानी असं म्हटलं जातं. कारण जगातली सर्वाधिक जुळी मुलं इथेच जन्माला येतात. म्हणूनच इथे जुळ्यांच्या उत्सवाचं आयोजन केलं जातं. या उत्सवात जगभरातली जुळी भावंडं सहभागी होतात. लहान बाळांपासून १०० वर्षांच्या आजीआजोबांपर्यंत विविध वयोगटातली भावंडं इथे पहायला मिळतात. इथल्या महिलांच्या आहारविहाराच्या सवयींमुळे जुळ्या मुलांचा जन्म होत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. मात्र शास्त्रज्ञांनी याबाबत शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे या भागात एवढ्या मोठ्या प्रमाणावर जुळी मुलं का जन्म घेतात, हे एक गूढच आहे.

डाएट मंत्रा

## रक्तगटानुसार घ्या आहार

रक्तगटानुसार आहार घेतला तर अधिक लाभ होत असल्याचं संशोधकांच्या एका गटाचं ठाम मत आहे. रक्तगटाच्या अनुषंगाने पोषक घटकांचं सेवन केल्यास तंदुरुस्तीची वाढते. रक्तगटानुसार आहार घेतल्यास पचनाच्या तक्रारीही कमी होतात. हाच विषय विस्तारपूर्वक समजून घेऊ. ✼ 'ए'- हा रक्तगट असणाऱ्या व्यक्तीची पचनसंस्था नाजूक असते. रक्तगट ए पॉझिटिव्ह किंवा ए निगेटिव्ह असणाऱ्या स्त्रियांनी आहारात हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली कडधान्यं, फळं, सुका मेवा इ.चा समावेश करावा. ✼ 'बी'-आहार निवडीबाबत या रक्तगटाच्या महिला नशिबवान असतात. त्या कोणताही पदार्थ खाऊ शकतात. त्यांच्यामध्ये प्रत्येक पद्धतीचं जेवण पचवण्याची क्षमता असते. बी रक्तगट असणाऱ्यांनी पॅकबंद पदार्थांचं सेवन टाळावं. ✼ 'एबी'- एबी रक्तगट असणाऱ्या महिलांनी आहारात प्रोटीनयुक्त घटकांचा समावेश करावा. लाल मांस किंवा स्मोक्ड मांसाचं सेवन टाळावं. त्याऐवजी टोफू, मासे, दूध, दही आदी पदार्थांचं सेवन करावं. ✼ 'ओ-ओ रक्तगट असणाऱ्या महिलांनी हाय प्रोटीन डाएट घ्यावं. पोटाच्या समस्या असल्यास दुधाचं सेवन टाळावं.




Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४ पान ३


## सुविचार

स्वतःला परिस्थितीचे गुलाम समजू नका. तुम्ही स्वतःच स्वतःचे भाग्यविधाते आहात. **संकलित**

## सामान्यज्ञान

जर्मनीच्या पहिल्या उड्डाणाद्वारे फक्त टपालसेवा आणि वर्तमानपत्राची ने-आण करण्यात आली.

**संकलन - अरविंद ब्राम्हणे**

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




**'महागाई वाढलीय' हे साहेबांना मान्यच होत नव्हतं... पण सभेला व प्रचार मिरवणूकीला हजर राहणाऱ्या लोकांनी यावेळी दुप्पट पैसे मागितले, तेव्हा त्यांना ते पटलं!**

## निवडक

### राज्यातील शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर



**पुणे, दि. १९–** राज्याच्या शिक्षण विभागाकडून शाळांना उन्हाळी सुटी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार २ मेपासून उन्हाळी सुटी सुरू होणार असून, उर्वरित राज्यातील शाळा १५ जूनपासून, तर विदर्भातील शाळा १ जुलैपासून सुरू होणार आहेत. या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुटीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता, सुसंगती राहण्यासाठी उन्हाळी सुटी, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरू करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यातील शाळांना २ मेपासून उन्हाळी सुटी जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील इतर मंडळांच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास किंवा अशा शाळांमध्ये महत्त्वाचे शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येत असल्यास विद्यार्थ्यांना सुटी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने उचित निर्णय घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

### नवनीत राणांवरील वक्तव्यावर संजय राऊत ठाम



**मुंबई,दि. १९–** खासदार संजय राऊत यांनी अमरावती लोकसभा मतदारसंघातील भाजप उमेदवार नवनीत कौर राणा यांना नटी संबोधल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. संजय राऊत हे सांगली दौऱ्यावर आले. यावेळी काँग्रेसचे आमदार विक्रम सावंत आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची त्यांनी भेट घेतली. ठाकरेंच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा करताना संजय राऊत यांनी आता नटीला नटी म्हणणार नाही तर काय म्हणणार? असा पुनरुच्चार केला.आता नटीला नटी म्हणणार नाही तर काय म्हणणार? नटीच म्हणणार ना. ती डान्सर आहे आता आम्ही गणपत पाटलांना प्रेमाने नाच्या म्हणतोच की... ॲक्टर्स म्हणायला मला इंग्लिश येत नाही, अशी टिप्पणीही संजय राऊत यांनी केली.

## महाराष्ट्रात ५ मतदारसंघात तर २१ राज्यातील १०२ ठिकाणी मतदान

# लोकशाहीच्या मोठ्या उत्सवाला सुरुवात



**समाचार/नगर-दि.१९**

जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारतात आज लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवाला सुरुवात झाली. आज सकाळी ७ पासून लोकसभा निवडणुकच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात झाली असून, २१ राज्यांमधील १०२ मतदारसंघात मतदान होत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ५ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यात रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या मतदारसंघांचा समावेश आहे. दरम्यान, आज या पाच लोकसभा मतदारसंघातील विविध नेते आपल्या मतदानाचा हक्का बजवताना दिसत आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीदेखील आज नागपुरात आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांनी मोठ्या फरकाने विजयी होण्याचा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, आज आपण देशातील लोकशाहीचा सर्वात मोठा सण साजरा करत आहोत. मतदान हा प्रत्येकाचा मुलभूत हक्क आणि कर्तव्य आहे, त्यामुळे प्रत्येकाने मतदान करावे. गेल्या वेळी ५४ टक्के मतदान झाले होते, यावेळी मतदानाची टक्केवारी ७५ टक्क्यांवर नेण्याचा आमचा संकल्प आहे. तुम्ही कोणालाही मत देऊ शकता पण मतदान करणे महत्त्वाचे आहे. मला १०१ टक्के विश्वास आहे की, मोठ्या फरकाने जिंकेन. दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीदेखील आज मतदानाचा हक्क बजावला. त्यांनी कोराडी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन मतदान केले. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते प्रफुल्ल पट्टेल यांनीदेखील आज गोंदियामधील मतदान केंद्रावर आपल्या मतदानाचा हक्का बजावला आहे.

### पहिल्या टप्प्यात कुठे-कुठे मतदान

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यामध्ये तामिळनाडू (३९ जागा), उत्तराखंड (५ जागा), अरुणाचल प्रदेश (२ जागा), मेघालय (२ जागा), अंदमान आणि निकोबार (१ जागा), मिझोराम (१ जागा), नागालँड (१ जागा), पुदुचेरी (१ जागा), सिक्किम (१ जागा), लक्षद्वीप (१ जागा), राजस्थान (१२ जागा), उत्तर प्रदेश (८ जागा), मध्य प्रदेश (६ जागा), आसाम (५ जागा), महाराष्ट्र (५ जागा), बिहार (४ जागा). पश्चिम बंगाल (३ जागा), मणिपूर (२ जागा), त्रिपुरा, जम्मू-काश्मीर आणि छत्तीसगडमधील प्रत्येकी एखा जागेवर आज मतदान होत आहे.

## शरद पवार यांचे वक्तव्य

# राममंदिरात सीतेची मूर्ती का नाही?

पुणे,दि. १९-अयोध्येत २२ जानेवारी या दिवशी राम मंदिरात राम मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरसंघचालक मोहन भागवत आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ या तिघांच्या उपस्थितीत तसेच साधू-संतांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. नुकतीच अयोध्येतल्या मंदिरात रामनवमी साजरी झाली आणि सूर्यतिलक सोहळाही पार पडला. आता रामाच्या मंदिरात सीतेची मूर्ती का नाही, असा प्रश्न शरद पवारांनी विचारला आहे.

पवार म्हणाले, एका मिटिंगमध्ये माझ्यापुढे विषय निघाला. त्यात महिलांनी अशी तक्रार केली की, रामाचे सगळं बोलत आहात. मग सीतेची मूर्ती का बसवत नाही? मी महाराष्ट्रात फिरतो आहे. मला अनुकूल चित्र दिसत आहे. राम मंदिर होऊन गेले आता त्याविषयी लोकांमध्ये चर्चा नाही. तसेच या सरकारविषयी नाराजी आहे. असे पवार म्हणाले. शरद पवारांना राम मंदिराचा मुद्दा महत्त्वाचा ठरेल का? हा प्रश्न विचारला होता. त्यावर त्यांनी हे उत्तर दिले आहे.कांद्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यंदा देशात साखरेचे उत्पादनही महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर झाले. निर्यातीचा प्रश्न आहे. शेतीमाल बाहेर गेला पाहिजे, शेतकऱ्यांच्या हातात दोन पैसे अधिकचे पडले पाहिजेत, या गोष्टीला या सरकारचा विरोध आहे. शेतकऱ्यांना वर्षातून एकदा सहा हजार रुपये द्यायचे, पण खतांचे दर वाढतात, औषधे महाग झाली आहेत. मजुरी महाग झाली आहे, याकडे कोण बघणार? असाही प्रश्न शरद पवारांनी उपस्थित केला.

### बावनकुळे यांची पवारांवर टीका

राम मंदिरात बालरुपातील रामलल्ला विराजमान आहेत. मात्र पवारांना फक्त राजकारण करण्यात रस आहे. शरद पवार घरात आलेल्या सुनेला बाहेरची म्हणून हिणवतात त्यांना आज सितामाईंबद्दल कळवळा येणे म्हणजे ढोंगीपणा आहे, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

## शरद पवार यांची आज नगरमध्ये सभा

**समाचार/नगर-दि.१९**

महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार निलेश लंके यांच्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेच्या सांगता सभेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार आज नगरमध्ये येणार आहेत. आज सायंकाळी ५ वाजता शहरातील गांधी मैदान येथे त्यांची सभा होणार आहे.



या सभेला काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, आदित्य ठाकरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी लंके यांच्याकडून शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. महायुतीकडून विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे हे पुन्हा निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यांच्या विरोधात लंके निवडणूक लढवित आहेत. पवार आणि विखे यांच्यातील 'राजकीय सख्य' सर्वश्रूत आहेत. त्यामुळे या सभेत शरद पवार काय बोलतात याकडे मतदार संघाचे लक्ष लागले आहे.

१ एप्रिलपासून मोहटा देवी गडावरुन लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा सुरूझाली होती. १९ दिवस चाललेली ही यात्रा पाथर्डी, शेवगाव, राहुरी, कर्जत, श्रीगोंदा, जामखेड, पारनेर या तालुक्यामधून नगर शहरात दाखल झाली. या जनसंवाद यात्रेमध्ये लंके यांनी जनतेशी संवाद साधला. या यात्रेत महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. या जनसंवाद यात्रेची सांगता आज शरद पवार यांच्या उपस्थितीत होणार आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके आणि भाजपाचे खासदार सुजय विखे यांच्यात चुरशीची निवडणूक होत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने विखे आणि लंके यांच्यात आरोप प्रत्यारोप झाले आहेत. त्यामुळे या निवडणूकीकडे जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे लक्ष लागले आहे.

## पहिल्या दिवशी

# ७३ उमेदवारी अर्ज घेतले

**समाचार/नगर-दि.१९**

नगर दक्षिण व शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज विक्री व दाखल करण्यास कालपासून (दि. १८) सुरूवात झाली आहे. काल पहिल्या दिवशी नगर दक्षिण मतदारसंघासाठी २२ जणांनी ४२ उमेदवारी अर्ज घेतले तर शिर्डी मतदारसंघासाठी १८ जणांनी ३१ उमेदवारी अर्ज नेले आहेत.

सार्वजनिक सुट्ट्यांचे दिवस वगळता उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख दि. २५ एप्रिल आहे. दाखल उमेदवारी अर्जांची दि. २६ एप्रिल रोजी छाननी केली जाणार आहे. दरम्यान, नगर दक्षिण मतदारसंघासाठी शक्ती सिंग यांची निवडणूक निरीक्षक (खर्च) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कुंदन दंडगव्हाळ यांची नियुक्ती केली आहे. नगर दक्षिणमध्ये खा. सुजय विखे आणि माजी आ. नीलेश लंके असा थेट सामना होणार आहे. तर शिर्डी मतदारसंघात खा. सदाशिव लोखंडे आणि माजी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्यात लढत होणार असून, उत्कर्षा रूपवते या वंचित बहुजन आघाडीकडून रिंगणात उतरणार आहे.

## सुदाम मेहेत्रे यांचे निधन



**समाचार/नगर-दि.१९**

मेहेत्रे कंन्स्ट्रक्शचे संस्थापक सुदाम सखाराम मेहेत्रे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७१ वर्षांचे होते. त्यांच्यावर नालेगांव अमरधाम स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. ते महात्मा फुले शिक्षण संस्थेचे माजी संचालक होते. सामाजिक कार्यात ते नेहमी सक्रिय सहभागी असत.

## मनपाकडून दोनशे मालमत्तांचे प्रायोगिक तत्वावर सर्वेक्षण

# १ कोटी ४० लाख मालमत्तांचे होणार पुनर्मूल्यांकन

**समाचार/नगर-दि.१९**

शहरातील मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. सुमारे १.४० लाख मालमत्तांचे घर टू घर सर्वेक्षण करण्यात येणार आहे. मे.सी.ई. इंन्फो सिस्टीम, नवी दिल्ली या संस्थेमार्फत हे काम सुरू असून प्रायोगिक तत्त्वावर शहर व सावेडी उपनगर परिसरातील दोनशे मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. मनपा प्रशासनाकडून घेतलेल्या मोजमापांची पडताळणी करण्यात येणार असल्याचे प्रशासक डॉ. पंकज जावळे यांनी सांगितले. महापालिकेमार्फत यापूर्वी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात सर्वेक्षण, मूल्यांकन निश्चिती होऊन मालमता कर आकारणी करण्यात आली आहे. त्यानंतर काही वर्षांपूर्वी कोलकाता येथील एका संस्थेमार्फत जीआयएस प्रणालीच्या माध्यमातून काम सुरू झाले होते. मात्र, ते अर्धवट अवस्थेत बंद केले गेले. आता मालमत्तेची डिजीटल छायाचित्रे, जिओ टॅगींग तसेच डिजीटल उपकरणांद्वारे मोजमाप करण्यात येणार आहे. तसेच, संपूर्ण कर आकारणी प्रणालीचे संगणकीकरण केले जाणार आहे. शहरातील सर्व जागा, इमारती, घरांचे सर्वेक्षण, जीआयएस मॅपिंग (घर टू घर), संगणकीकरण, मालमत्ता कर मुल्यनिर्धारण झोन निहाय व महापालिका निर्देशित कर आकारणी वॉर्ड रचनेप्रमाणे क्रमांक देणे, स्थळपाहणी करुन आवश्यक माहिती संकलित करणे, मालमत्तांचे संगणकीकृत नकाशे काढणे, डिजिटल छायाचित्र काढून संगणक प्रणालीत जोडणे, जीआयएस आधारीत कर मूल्यांकन झोन नकाशा तयार करणे, संपूर्ण कामाचे संगणकीकरण व संगणकीकृत कर आकारणी करुन मालमत्ताधारकांची सुनावणी घेणे, संपूर्ण मालमत्तांचे मूल्यांकन प्रकरणे प्रारुप व अंतिम करमूल्यनिर्धारण यादी तयार करणे, वार्षिक देखभाल दुरुस्ती व साहित्य पुरवठा करणे आदी कामे संस्थेमार्फत होणार आहेत. गेल्या काही दिवसांत संस्थेने सावेडी उपनगर व मध्य शहरातील दोनशे मालमत्तांचे सर्वेक्षण करून त्यांची छायाचित्रे व मोजमापे घेतली आहेत. सर्वेक्षणात मोजमापांसह मालमत्ता निवासी आहे की व्यावसायिक, त्याचा वापर कशासाठी होत आहे. यापूर्वी किती कर भरला आहे आदी विविध मुद्यांची माहिती संकलित करण्यात येत आहे.

## मोबाईल सेवेचे दर वाढवले जाण्याची शक्यता

# लोकसभा निवडणुकीनंतर बोलणे होणार महाग?

**मुंबई,दि. १९-** प्रदीर्घ काळानंतर महागाईच्या आघाडीवर जनतेला दिलासा मिळू लागला आहे. तथापि, या प्रकरणात लवकरच समस्या उद्‌भवू शकतात. लोकसभा निवडणुकीनंतर सर्वसामान्यांना महागाईचा झटका बसू शकतो आणि हा धक्का टेलिकॉम कंपन्या देऊ शकतात.

एका अहवालानुसार जिओ आणि एअरटेलसारख्या दूरसंचार कंपन्या टॅरिफ वाढवण्याचा विचार करत आहेत. देशातील लोकसभा निवडणुका संपल्यानंतर या कंपन्या मोबाइल दरात कधीही वाढ करण्याची घोषणा करू शकतात. असे झाल्यास जूनमध्ये संपणाऱ्या निवडणुकानंतर लोकांना मोबाईल फोन वापरणे महाग होणार आहे. त्यामुळे दर जास्त वाढू शकतात. अँटिक स्टॉक ब्रोकिंग या विश्लेषक संस्थेच्या हवाल्याने ही भीती व्यक्त करण्यात आली आहे. अँटिक स्टॉक ब्रोकिंगचा विश्वास आहे की, जियो आणि एअरटेलसारख्या मोठ्या टेलिकॉम कंपन्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर आपले प्लॅन्स महाग करू शकतात. निवडणुकीनंतर टेलिकॉम कंपन्या १५ ते १७ टक्क्यांनी दर वाढवू शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे; मात्र मोबाइल कंपन्यांनी याबाबत अद्याप अधिकृतपणे काहीही सांगितलेले नाही.



अलिकडेच जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार किरकोळ महागाईचा दर मार्च महिन्यात पाच टक्क्यांच्या खाली आला आहे. देशात जूनपर्यंत निवडणुकांचा कार्यक्रम सुरु राहणार आहे. पुढील काही आठवडे विविध टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे. ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होतील. यानंतर मोबाईल सेवेचे दर वाढवले जाऊ शकतात. अँटिक स्टॉक ब्रोकिंगच्या मते दर वाढवल्याने टेलिकॉम कंपन्यांना फायदा होणार आहे. त्यातल्या त्यात भारती एअरटेलला सर्वात मोठा फायदा होऊ शकतो. एअरटेलचा प्रति वापरकर्ता सरासरी महसूल सध्या २०८ रुपये आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात तो २८६ रुपयांपर्यंत वाढू शकतो. रिपोर्टनुसार, जिओ सध्या टेलिकॉम उद्योगातील सर्वात मोठी कंपनी आहे. गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये जिओचा बाजारातील हिस्सा २१.६ टक्क्यांवरून ३९.७ टक्क्यांवर पोहोचला आहे.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## हनुमान चालिसा



**मंगल भक्त सेवा मंडळ**

शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**श्री. लंकेश हरबा**
हरबा तालीम जवळ, परशुराम खुंट, अहमदनगर

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडल**

शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**सम्यककुमार एंव पियुषजी संचेती**
महेश मंगल कार्यालयच्या मागे, तपकिरगल्ली, अहमदनगर

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**

शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**प्रतापगड युवा प्रतिष्ठाण**
गोंविद गॅरेजजवळ, वंजारगल्ली, **सागर मुर्तडकर, सचिन दिवटे**

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**

शुक्रवार, दि. १९ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
– स्थळ –
**सातभाई गल्ली गणेश मित्र मंडळ**
दिक्षित मंगल कार्यालयच्या समोर, दिल्लीगेट,अक्षय गांधी

## मुंबई शेअर भाव

**शेअरबाजारात अस्मानी सुलतानी सेन्सेक्स सटकला आणि उसळलाही**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक १९-४-२०२४ दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७२७१० |
| एसीसी | २३९४-९५ |
| एशियन पेंट | २७९८-९९ |
| बजाज ऑटो लि. | ८७४७-४८ |
| बलराम फूड चिनी | ३६६-६७ |
| भारत फोर्ज | ११९१-९२ |
| क्रॉम्प्टन | २९८-९९ |
| डीएलएफ | ८४९-५० |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ५८९७-९८ |
| ग्रॅफाईट इंडिया | ६७०-७१ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२२९-३० |
| आयटीसी लि. | ४२३-२४ |
| एल ॲण्ड टी लि. | ३५०८-०९ |
| रिलायन्स इंड. | २९२९-३० |
| एसबीआय | ७४३-४४ |
| टाटा मोटर्स | ९५६-५७ |
| टाटा स्टील | १६१-६२ |
| टीसीएस | ३८३९-४० |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २४९-५० |
| सुवेन फार्मा | ६४८-४९ |

# आ. थोरातांकडून पावसे कुटुंबांचे सांत्वन



**समाचार/नगर-दि.१९**

हिवरगाव पावसा येथील पावसे परिवारातील दोन सख्ख्या भावांचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या कुटुंबियांची भेट घेऊन काँग्रेस नेते आ.बाळासाहेब थोरात यांनी सांत्वन केले आहे. संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथे दिनांक १७ एप्रिल रोजी चार वाजता खेळण्यासाठी गेलेले दोन सख्ख्या भावांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. रितेश सारंगधर पावसे १२ वर्षाचा असून तो पाचवी शिकत होता तर प्रणव सारंगधर पावसे ८ वर्षाचा प्राथमिक विद्यालयात इ. ३री शिकत होता. वर्षापूर्वीच या घरातील वडिलांचे छत्र हरपल्याने आईने कष्टाने शेती करून मुलांचा संभाळ करून उदरनिर्वाह करत होत्या. परंतु शाळेला सुट्टी असल्याकारणाने खेळण्यासाठी गेलेल्या दोन भावाचा पाण्यात बुडून दुर्दैवी अंत झाल्याने पावसे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

आ.थोरात म्हणाले की पावसे कुटुंबाच्या दुःखात आपण सहभागी असून शासकीय स्तरावर जी मदत असेल ते मिळून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे. तसेच गावातील गावकऱ्यांनी पावसे कुटुंबाच्या मागे भक्कमपणे उभे राहून आधार देण्याचे काम करावे असे ते म्हणाले.

# वाळुंजच्या सरपंचपदी पार्वती हिंगे बिनविरोध




**समाचार/नगर-दि.१९**

वाळूंज (ता. नगर) ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी पार्वतीताई हिंगे यांची दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली.

गुरुवारी (दि.१८ एप्रिल) वाळूंज ग्रामपंचायत कार्यालयात निवडणुक प्रक्रिया पार पडली. हिंगे यांची सरपंच पदासाठी निवड झाल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. यापूर्वी त्या २००५ ते २०१० या काळात सरपंच होत्या. मावळते सरपंच विजय शेळमकर यांनी राजीनामा देऊन पार्वतीताई हिंगे यांचे नाव सरपंच पदासाठी सुचविले होते. सरपंच पदासाठी पार्वतीताई हिंगे यांचा एकमेव अर्ज दाखल. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून वैशाली साळवे यांनी काम पाहिले. त्यांना तलाठी सुरेखा आबुज, ग्रामसेविका सरिता पवार यांनी सहकार्य केले. यावेळी माजी सरपंच महादेव शेळमकर, विजय शेळमकर, उपसरपंच अलका दरेकर, ग्रामपंचायत सदस्य अनिल मोरे, नलिनी पाडळे, सुमित रोहोकले, कविता गायकवाड, चेअरमन रमाकांत शिंदे, व्हाईस चेअरमन भाऊ जाधव, वाळुंज माता ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश शिंदे, मुख्याध्यापक भाऊसाहेब रोहोकले उपस्थित होते.




# पद्मशाली स्नेहिता संघमतर्फे अल्पदरात आरोग्य शिबीर

**समाचार/नगर-दि.१९**

पद्मशाली स्नेहिता संघम या महिला मंडळास या गुढी पाडव्याला चोवीस वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्ताने महिलांसाठी आरोग्य तपासणी व अल्पदरात सोनोग्राफी व रक्त तपासणीसाठी शिबिराचे आयोजन केले.

डॉ. नितीन जगताप व डॉ. नयना जगताप यांचे जगताप हॉस्पिटल व प्रसूतिगृह येथे त्यांच्या सहकार्याने संपन्न झाले.

डॉ. रत्ना बल्लाळ यांनी प्रास्ताविकात संघमचे कार्य आणि डॉ. जगताप या दांपत्याचा परिचय करुन दिला.

डॉ. नितीन जगताप यांनी उपस्थित महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. डॉ. नयना जगताप यांनी कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन महिलांनी काय काळजी घ्यावी, याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. डॉ. नितीन जगताप यांनी अल्प दरात सोनोग्राफी करुन दिली व डॉ. नयना यांनी महिलांची शारीरिक तपासणी केली.

यावेळी उपाध्यक्षा रेखा वड्डेपेल्ली, सचिव सपना छिंदम, खजिनदार निलिमा अडगटला, सदस्या प्रमिला वन्नम, पूजा म्याना, आरती छिंदम, सविता कोटा, रोहिणी पागा, कल्पना बुलबुले, सुरम पल्लवी, सुवर्णा पुलगम, पूनम वन्नम, डॉ. नूतन फिरोदिया, डॉ. प्रीती सुरकुटला, डॉ. हिरा अडगटला, वैष्णवी क्यादर उपस्थित होत्या.

## स्थानिक गुन्हे शाखेची तिघांविरूध्द कारवाई

# संगमनेरमध्ये १५०० किलो गोमांस पकडले

**समाचार/नगर-दि.१९**

संगमनेर शहरामध्ये गोवंशीय जनावराची कत्तल करणाऱ्या ३ आरोपींना २० लाख ७२ हजार रुपये किमतीच्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलीस अंमलदार सचिन अडबल, बापुसाहेब फोलाणे, गणेश भिंगारदे, संतोष लोढे, अतुल लोटके, संतोष खैरे, रणजित जाधव, रविंद्र घुंगासे, सागर ससाणे, बाळासाहेब गुंजाळ, आकाश काळे, विशाल तनपुरे, उमाकांत गावडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

संगमनेर शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती घेत असताना जमजम कॉलनी, संगमनेर या ठिकाणी गोवंश जातीची जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने आणून त्यांची कत्तल करत आहेत, अशी माहिती पोनि आहेर यांना मिळाली. सदर ठिकाणी पोलिस पथकाने रात्री सव्वादोनच्या सुमारास छापा टाकला असता, ३ इसम दोन पिकअपमध्ये कत्तल केलेले जनावरांचे मांस भरताना दिसले. त्यांनी त्यांची नावे रैय्यान शेरखान पठाण (वय २१, रा. रहेमतनगर, जोर्वे रोड, संगमनेर), सलमान हारुन मणियार (वय ३४, रा. मोमीनपुरा, संगमनेर), राझिक अब्दुल रज्जाक शेख (वय ३८, रा. अलकानगर, दिल्ली नाका, संगमनेर) असे असल्याचे सांगितले.त्यांच्या ताब्यातून ६ लाखाचा पिकअप (एम.एच. १७ बी.डी. ४१८२) व त्यामध्ये ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे १५०० किलो गोमांस, ६ लाखाचा रुपये पिकअप (एम.एच. ११ ए. जी. ३२४६) व त्यामध्ये १४०० किलो गोमांस, २ हजार रुपये किमतीचा एक सत्तुर, दोन सुरे व एक कुऱ्हाड असा एकुण २० लाख ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. पोहेकॉ सचिन अडबल यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एक जखमी

**समाचार/नगर-दि.१९**

शहरातील नगर- कल्याण महामार्गवर अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन जण जखमी झाले आहे. याप्रकरणी वैभव गोकुळ गडाळ (वय १८ , रा. लंबोदर रेसिडेसी, जाधव नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालका विरोधात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादी आणि त्याचे मित्र कुशल राम पवार हे दुचाकी वाहनाने नेप्ती नाक्याच्या दिशेने जात असताना त्यांना अज्ञात वाहनाने जोरदार दिलेल्या धडकेत ते आणि कुशल राम पवार हे जखमी झाल्याचे फिर्यादीमध्ये म्हटले आहे.


# कामाच्या बिलापोटी लाच घेताना सहाय्यक अभियंता सापळ्यात

**समाचार/नगर-दि.१९**

(ता.राहुरी) येथील पूर्ण झालेल्या कामाच्या ७ लाख ७५ हजार ९६३ रुपये बिलापोटी स्वतःला व कार्यकारी अभियंता यांच्यासाठी १८ टक्के रकमेची मागणी करत त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन ६२ हजारांची लाच स्वीकारताना पाटबंधारे संशोधन व जल निःस्सारण उप विभागच्या सहाय्यक अभियंत्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकूडले.

रुबिया मोहम्मद हनिफ शेख (वय ३५, रा. गाढेकर चौक, निर्मलनगर) असे या अभियंत्याचे नाव आहे. त्यांनी स्वतः साठी व कार्यकारी अभियंता रजनी पाटील (रा. नाशिक रोड, नाशिक) यांच्यासाठी लाच मागितली होती. बिलापोटी सहाय्यक अभियंता शेख यांनी स्वतः साठी ८ टक्के प्रमाणे व पाटील यांच्यासाठी १० टक्के प्रमाणे असे एकूण १८ टक्के प्रमाणे १ लाख ३९ हजार ५०० रुपये लाचेची मागणी केली होती. त्यापैकी ६२ हजारांचा पहिला हप्ता स्वीकारताना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शेख यांना रंगेहाथ पकडले. पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, पोलिस निरीक्षक शरद गोर्डे, अंमलदार रवींद्र निमसे, बाबासाहेब कराड, किशोर लाड, महिला अंमलदार राधा खेमनर, सना सय्यद, हरून शेख यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# 'आम्ही जरांगे'...मराठा आरक्षणाची संघर्षगाथा मोठ्या पडद्यावर...





## सिनेरंग

नारायणा प्रॉडक्शन निर्मित आणि योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित 'आम्ही जरांगे – गरजवंत मराठयांचा लढा' हा चित्रपट लवकरच आपल्या भेटीस येत आहे. मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या ज्वलंत चळवळीला मोठ्या पडद्यावर या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नुकताच या चित्रपटाचा लोगो लाँच करण्यात आला.

'आम्ही जरांगे – गरजवंत मराठ्यांचा लढा' या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद सुरेश पंडित यांचे असून मागील शंभर वर्षापासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या चळवळीसाठी झटलेले आणि आपल्या जीवाचे बलिदान देणारे मराठा क्रांतिवीर यांचा न पाहिलेला इतिहास पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर येत असल्याने प्रेक्षकांसाठी ही एक वेगळीच पर्वणी असणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्यासोबतच 'गरजवंत मराठ्यांचा लढा' हा आता फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नसून तो जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचला आहे.त्यामुळे अर्थातच 'आम्ही जरांगे' या चित्रपटाविषयीची उत्सुकता प्रदर्शना आधीपासूनच शिगेला पोहचली आहे.

# मराठी साहित्यातलं मानाचं पान फकिरा रुपेरी पडद्यावर




२०१५ ला प्रदर्शित झालेल्या 'ख्वाडा' या चित्रपटासाठी पहिल्याच प्रयत्नात राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरण्यात दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यशस्वी झाले. 'ख्वाडा', 'बबन', 'टीडीएम' अशा वास्तववादी धाटणीच्या चित्रपटांमधून आपलं वेगळेपण दाखवून देणारे भाऊराव कऱ्हाडे नवीन कोणता चित्रपट घेऊन येणार? ही उत्सुकता प्रेक्षकांना होतीच. या उत्सुकतेवरचा पडदा नुकताच उघडला आहे. इतिहासात दडलेल्या शौर्याचं तळपतं पान ते आपल्या चित्रपटातून उलगडणार आहे. आपल्या आगामी 'फकिरा' या चित्रपटाची घोषणा दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांनी नुकतीच केली. मराठी साहित्य विश्वात मानाचं स्थान असलेल्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' या अप्रतिम कादंबरीवरचा चित्रपट ते घेऊन येत आहेत.

विषय आणि सादरीकरणाच्या कक्षा रुंदावणाऱ्या या भव्य चित्रपटातून मराठी चित्रपटसृष्टीतील मोठी कलाकार मंडळी दिसणार आहेत. नाना पाटेकर, सयाजी शिंदे, प्रसाद ओक, मृणाल कुलकर्णी, मकरंद देशपांडे, मुक्ता बर्वे, नागेश भोसले, संदीप पाठक, कमलेश सावंत, किरण माने असे दिग्गज चेहरे चित्रपटात दिसणार आहेत. रुद्रा ग्रुप आणि चित्राक्ष निर्मिती यांच्या या चित्रपटात फकिरा' ही मध्यवर्ती भूमिका कोण करणार? हे अजून गुलदस्त्यात आहे.

चित्रपटाच्या घोषणेप्रसंगी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची स्नुषा सावित्रीबाई मधुकर साठे, दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे, अभिनेते नागेश भोसले, कमलेश सावंत, चित्रपटाचे डीओपी वीरधवल पाटील, लेखक मंदार जोशी आदि मान्यवर उपस्थित होते.समाजाला भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा, इंग्रजी राजवटीचा आत्यंतिक जुलूम आणि सर्वांविरोधात बंड करणारा लढवय्या 'फकिरा' याचे यथार्थ चित्रण करणाऱ्या फकिरा' कादंबरीचे चित्ररूप रुपेरी पडद्यावर पहायला मिळणार आहे. २०२५ मध्ये 'फकिरा' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## शब्दखेळ – १५३

खाली दिलेल्या चौकोनात १० माजी क्रिकेटपटूंची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | तो | म | हें | द्र | ह्य | पी | ह |
| चि | जो | जी | रा | ली | क | ला | र |
| न | क | स | हु | त | पि | रा | भ |
| कु | पी | फी | ल | ड | ल | स | ज |
| दि | ली | प | झ | ए | र | वी | न |
| ण | मे | ल | ही | रा | ठा | सी | स |
| द | हु | व | र | ए | का | प्रे | बी |
| वि | नो | द | व | शी | अ | जि | त |

### शब्दखेळ – १५२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रे | कृ | मी | रिं | डा | र | का | को |
| ड | थ | म्स | अ | प | न | से | का |
| बु | यु | ढ | क्रो | त्र | पे | व | को |
| ल | नी | स | स | गी | ली | न | ला |
| स | बॉ | सा | पा | फाँ | क | अ | ट |
| लि | ल | रा | फ | टा | न | प | स्प्रा |
| म्का | प्सी | झा | य | ल | ट | ण | ई |
| ळी | पे | मा | र | मे | न | दा | ट |



# 'स्वामी दरबार' भक्तांच्या भेटीला

अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ यांचा 'दरबार' आता भक्तांच्या भेटीला येणार आहे. गीत, संगीत, नृत्य, नाट्य आणि नामस्मरण असे या आगळ्या अध्यात्मिक रंगप्रयोगाचे स्वरूप असून बुधवार, १० एप्रिल रोजी म्हणजेच स्वामी प्रकट दिनी शिवाजी मंदिर येथे रात्री ८ वाजता या दरबाराचा शुभारंभाचा प्रयोग संपन्न झाला.

ऑल सेट या संस्थेची निर्मिती असलेला हा दरबार स्वामीराज प्रकाशन यांनी आयोजित केला आहे. या दरबाराचे खास वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक प्रयोगाला काही नामवंत सेलिब्रिटी प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांचे स्वामी कृपानुभव सांगणार आहेत. शुभारंभ प्रयोगाला अनेक चित्रपट, मालिकांमध्ये ' स्वामींची ' भूमिका साकारणारे अशोक कुलकर्णी आणि प्रसिद्ध पार्श्वगायिका वैशाली सामंत उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे प्रसिद्ध अभिनेत्री दीप्ती भागवत या दरबारात निरूपण सुसंवादकाची भूमिका साकारणार आहेत.

सागर देशपांडे संकल्पित – दिग्दर्शित या कार्यक्रमासाठी खास गीत लेखन श्रावण बाळा यांनी केले असून शशिकांत मुंबरे यांनी स्वरसाज दिला आहे. पद्मश्री सुरेश वाडकर आणि साधना सरगम हे गायक असून नाट्य दिग्दर्शन, नेपथ्य सुनील देवळेकर यांचे आहे. नृत्य दिग्दर्शन सचिन गजमल यांचे असून नृत्य – नाट्य कलाकारांसह तरुण रंगकर्मी मयुरेश कोटकर हे स्वामींची भूमिका साकारणार आहे रजनी आणि पूजा राणे निर्मात्या आहेत. हा दरबार सर्व स्वामी भक्तांसाठी अध्यात्मिक पर्वणी असून सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे.

## नाट्यरंग

लोकरंजन

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

### राष्ट्रसेवा दलाच्या संस्कार शिबिराचे उद्‌घाटन

# शिबिरातील संस्कारमूल्य आत्मसात करावे - कुलकर्णी

**समाचार/नगर-दि.१९**




रावसाहेब पटवर्धन यांच्या विचारधारेच्या अनुषंगाने रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती व राष्ट्र सेवा दल अहमदनगर यांच्यावतीने दि.१४ ते २६ एप्रिल दरम्यान बालसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराचे उदघाटन स्मारक समितीचे ज्येष्ठ विश्वस्त विजय सावंत यांचे अध्यक्षतेखाली झाले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी म्हणाले, साने गुरूजींचे विचार आचरणात आणावेत, शिबिरातून शिकविले जाणारे संस्कार मुल्य आत्मसात करावेत. लहान वयातच मुलांवर योग्य संस्कार होणे ही काळाची गरज बनले आहे. मोबाईलच्या मोहजालातून बाहेर काढण्यासाठी मुलांसाठी असे शिबीर नियमित आयोजित केले पाहिजे, असे सांगून त्यांनी युग निर्माता हम बच्चे कल की आशा हम बच्चे’ हे गीत मुलांकडून म्हणून घेतले.

समितीचे सचिव अ‍ॅड.रविंद्र शितोळे यांचे भाषण झाले. मागीलवर्षी शिबीरात सहभागी झालेले पैकी स्वरा व अर्पिता यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचप्रमाणे पालकांपैकी लासुरे ताई व बोठे सर यांनी शिबीरातील उपक्रमांचे कौतुक केले. समितीच्या उपाध्यक्षा शोभा ढेपे यांनी शिबीरात मुला-मुलींना पाठविल्याबद्दल पालकांचे आभार मानले.

संस्कार मुल्यांबरोबरच स्मरणशक्तीचे विविध खेळ, लेझीम, सुर्यनमस्कार, योगासने, विविध विषयतज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने व प्रात्यक्षिक कार्यशाळा, व्यक्तिमत्व विकास, संस्कारक्षम अशा कथामालेच्या माध्यमातून गोष्टी प्रतिज्ञा व संविधानाचे अभिवाचन आणि पथनाटय प्रशिक्षण इत्यादी बाबींचा सुध्दा या शिबीरात समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती शिबीर प्रमुख शिवाजी नाईकवाडी यांनी सांगितली. हे शिबीर पुढील तेरा दिवस रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती, भिस्तबाग रोड, सावेडी, अहमदनगर येथे हा संस्कारवर्ग होणार असून वर्गाची वेळ दररोज सकाळी ७.३० ते १२.३० व सायं.४.३० ते ७.३० अशी असेल.

यावेळी स्मारक समितीच्या उपाध्यक्षा शोभा ढेपे, शिबीर संयोजक व सचिव अ‍ॅड.रवींद्र शितोळे, विश्वस्त सर्वश्री गणेश गावडे, दत्तात्रय जंगम, विजय सावंत, सुहास अंतरकर, जगन्नाथ गुंड तसेच सेवा दलाचे कार्यकर्ते दत्ता दिकोंडा, पुरूषोत्तम जाधव, बापू जोशी, अरूण आहेर, विवेक पवार आदी उपस्थित होते.




### मनसेची मनपा आयुक्तांकडे मागणी

# प्रभाग सहामधील कचऱ्याचे ढीग हटवा

**समाचार/नगर-दि.१९**

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.६ उदय अपार्टमेंट, अक्षय अपार्टमेंट, अंबर अपार्टमेंट, कांचनगंगा अपार्टमेंट तसेच न्यूक्लियस हॉस्पिटल परिसरात रस्त्यावर व आजुबाजूला मोठ्या प्रमाणात कचर्‍याचे ढीग तयार झाले आहे. ते तातडीने हटविण्यात यावेत, या मागणीचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने मनपा आयुक्त डॉ.पंकज जावळे यांना देण्यात आले.

याप्रसंगी मनसेचे सावेडी विभाग अध्यक्ष किरण रोकडे, भूषण कोठारी, समर्थ मुर्तडकर, वृषभ साबळे, शिवम बांगर आधी उपस्थित होते. निवेदनात म्हटंले आहे की, या भागात घंटागाडी नियमित नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. रस्त्यावर साठलेल्या कचर्यममुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या भागात घंटागाडी नियमित करावी व रस्त्यावर साठलेला कचरा साफ करण्यात यावा तसे न झाल्यास मनसेचे शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या आवारात तिव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

### हिवरे बाजार येथे श्रीराम कथेला प्रारंभ

# रामचरितमानसमध्ये तुलसीदासांची वाणी - शर्मा



**समाचार/नगर-दि.१९**

आयन म्हणजे घर आणि रामायण म्हणजे प्रभू श्रीरामाचा निवास आणि चौपाई म्हणजे आपण थकून भागून घरी आल्यावर ज्यावर आराम करतो ती तुलसीदासजींच्या या चौपायांवर प्रभू श्री रामचंद्र गोड आराम करतात. तुलसीदासांनी श्री राम चरित् मानस रचले. मानस हाई शब्द गुजराती आहे आपण म्हणतो ना भला माणूस. म्हणजे प्रभू श्रीरामाचे चरित्र माणसासारखे ऐकणे म्हणजे श्री राम चरित् मानस होय असे प्रतिपादन हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी केले. नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरे बाजार येथे प्रभू श्री रामचंद्रांच्या शीलांश स्थापनेनिमित्त हरिभक्त पारायण समाधान महाराज शर्मा यांच्या श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आलं आहे त्याच्या शुभारंभ प्रसंगी महाराज कथा निरूपणात बोलत होते या दिवशी शिवपार्वती विवाह अख्यान याद्वारे कथेला सुरुवात झाली. ते म्हणाले की आपल्या देशात मानसरोवर आहे ज्याच्यामध्ये पाणी आहे आणि रामचरितमानसमध्ये तुलसीदासांची वाणी आहे मानस सरोवर शेजारी सगळे हंस जमा होतात इथे सगळे परमहंस जमा होतात. त्याला चार घाट आहेत.

प्रास्ताविकात पोपटराव पवार म्हणाले की गतजन्मी ची नव्हे तर शतजन्माची पुण्याई म्हणून की काय प्रभू श्रीरामाचा शिलांश हिवरे बाजार मध्ये आला आहे. त्याच्या स्थापनेसाठी समाधान महाराज शर्मा येतात हे देखील परम भाग्य आहे आपल्या सुमधुर वाणीतून अतिशय आकर्षकपणे ते कथा सादर करतात मौलिक विचार मांडतात हिवरे बाजारचे हे भाग्य आहे जणू रामराज्य येथे साकारते आहे. असे ते म्हणाले.

# रामदासीवाड्यात रामनवमीचा जल्लोष

**समाचार/नगर-दि.१९**





शहरातील गुजरगल्ली येथील भाजपचे ज्येष्ठनेते सुनील रामदासी यांच्या वाड्यात श्रीराम जन्मोत्सव व समर्थ रामदास स्वामींची जयंती भक्तिपूर्ण वातावरणात साजरी झाली. राम जन्माला गं सखे राम जन्माला...’ या गीत रामायणातील गीताच्या तालावर माध्यान्ह काळी बारा वाजता श्रीरामचा जन्म साजरा झाला. यावेळी भाविकांनी पुष्पवृष्टी करून राजाधिराज रामचंद्र महाराज कि जय..., जय श्रीराम... जय श्रीराम...च्या जयजयकार करत उत्साहात व भक्तिपूर्ण वातावरणा श्रीराम जन्मोत्सव सोहळा साजरा केला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव यांच्या हस्ते रामदासिंच्या देवघरातील पुरातन श्रीराम मूर्तींची आरती करण्यात आली. यावेळी पुण्याच्या कीर्तनकार चैत्राली जोशी यांचे श्रीराम जन्मावर नारदीय कीर्तन रंगले. कीर्तनकार चैत्राली जोशी यांनी पारंपारिक पद्धतीने केलेल्या नारदीय कीर्तनात उपस्थित भाविक तल्लीन झाले होते.

सुनील रामदासी म्हणाले, सज्जनगडचे समर्थ रामदास स्वामी यांच्या देवघरातील श्रीरामाच्या मूर्ती प्रमाणेच आमच्या रामदासी वाड्यात श्रीरामाची पौराणिक मूर्ती आहे. या मूर्तीला मोठी आध्यात्मिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. गेल्या शेकडो वर्षापासून आम्ही श्रीराम नवरात्र व रामनवमी उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरी करत आहोत. दर वर्षी या सोहळ्यात हजारो भाविक सहभागी होत आहेत. गुडीपाडव्या पासून सुरु झालेल्या रामाच्या नवरात्र उत्सवाची आज भक्तिपूर्ण वातावरणात सांगता झाली आहे. यावेळी भाजपाचे माजी शहराध्यक्ष महेंद्र गंधे, संगीता रामदासी, सुहास रामदासी, गंधाली घाटे, मयुरी रामदासी, सुजय रामदासी आदींसह स्वयंसेवकांनी उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप केले.

### हमाल पंचायतीतर्फे अजिनाथ घुले यांचा सत्कार

# कष्टकऱ्याचा मुलगा पोलिस अधिकारी झाल्याचा अभिमान- घुले

**समाचार/नगर-दि.१९**



कृषी उत्पन्न समितीमधील कष्टकरी कामगार भिवसेन घुले यांचा मुलगा आजिनाथ हा पोलिस उपनिरिक्षक परिक्षा उत्तीर्ण झाला, याचा हमाल पंचायत व सर्वच कष्टकऱ्याना अभिमान आहे. त्यांचे हे यश इतर मुलांसाठी प्रेरणादायी राहील. कष्टकर्यांच्या मुलांनी उच्च शिक्षित होऊन आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचे चिज करावे, असे आवाहन हमाल पंचायतचे जिल्हा अध्यक्ष अविनाश घुले यांनी केले.

अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतच्यावतीने पोलिस उपनिरिक्षकपदी अजिनाथ घुले यांची निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपाध्यक्ष गोविंद सांगळे, सचिव मधुकर केकाण, बहिरु कोतकर, सतिश शेळके, भिवसेन घुले, रविंद्र भोसले, चंद्रकांत हंबर्डे, संजय शिरसाठ, गोटू फुंदे, मच्छिंद्र गिरी, नामदेव बटुळे, तबाजी कार्ले, बाबा गिते, युवराज राऊत, अजुन शिंदे, सोनू खोमणे, आसिफ कादरी, कचरु शिरसाठ, डॉ.विजय कवळे आदि उपस्थित होते.

सत्कारास उत्तर देतांना अजिनाथ घुले म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात करिअर करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीची गरज असते. आज प्रत्येक क्षेत्रात मोठी स्पर्धा आहे, त्यामुळे तुम्ही तुमचे लक्ष निश्चित केले पाहिजे. ही परिक्षा सोपी नव्हती, परंतु आई-वडिलांचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी आपण जिद्दीने हे यश मिळविले. यासाठी हमाल पंचायतीचेही सहकार्य व प्रोत्साहन मिळाले असल्याचे सांगितले.

# जागेच्या वादातून चौघांची तरुणाला मारहाण

**समाचार/नगर-दि.१९**

कब्रस्तानला जागा देण्याच्या वादातून चौघांनी तरूणाला मारहाण करून जखमी केले. चाँद शाबीर पठाण (वय ३५ रा. जांब कौंडगाव ता. नगर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू असताना त्यांनी दिलेल्या जबाबावरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

समीर वजीर पठाण, असीफ वजीर पठाण, वसीम वजीर पठाण, बशीर वजीर पठाण (सर्व रा. जांब कौंडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. रविवारी (दि. १४) जांब कौंडगाव येथे ही घटना घडली. गावातील नागरिक व चाँद पठाण असे सर्व जण मिळून समीर पठाण याच्यासोबत गावातील कब्रस्तानात बोलत होते. त्यावेळी चाँद त्याला म्हणाले,शेतगट नंबर ३६ हा आपल्या दोघांचा समाईक असून त्या शेजारी आपण कब्रस्तानला जागा देऊ’ त्यावर समीर म्हणाला,ती जागा आमची आहे, तेथे कब्रस्तान करायचे नाही’, त्यानंतर गावातील नागरिक व फिर्यादी चाँद हे समीरला समजून सांगत असताना त्याला राग आला. त्याने चाँद यांना शिवीगाळ दमदाटी करून मारहाण केली. इतर तिघांनी पाण्याच्या पाईपने मारहाण करून जखमी केले. तु जर परत आमच्या नादी लागला तर तुला जिवे ठार मारून टाकू’ अशी धमकी देऊन शिवीगाळ, दमदाटी केली. जखमी चाँद यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबावरून चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.



# शिव राष्ट्र सेनेकडून अनिल शेकटकर उमेदवार

**समाचार/नगर-दि.१९**

शिवराष्ट्र सेना पक्षाच्या वतीने दक्षिण लोकसभा मतदार संघातून माजी नगरसेवक अनिल शेकटकर यांचा उमेदवारी अर्ज घेण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष संतोष नवसुपे, नगर दक्षिण जिल्हाध्यक्ष सतीश खैरे, ओबीसी आघाडी प्रमुख बाबासाहेब करपे, जिल्हा अध्यक्ष ग्रामीण बाळासाहेब जगधने, उत्तर जिल्हाध्यक्ष करण गारदे, संघटन मंत्री नवनाथ मोरे, संजय सुगंधी, सागर भंडारी, माऊली धाभाडे, सिद्धेश वैराळ, राहुल शेकटकर, विजय पाचारणे, राजेंद्र साळवे, शेख रशीद, संदिप पारधे, संदेश शेकटकर, अक्षय धनवट अदि उपस्थित होते. शिवराष्ट्र सेना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष संतोष नवसुपे सकल मातंग समाजाचे भगवान जगताप यांची भाषण झाले.

### मनपाच्या मतदान जनजागृती संकल्प रथाचे उद्‌घाटन

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिला बचत गट सक्रिय

**समाचार/नगर-दि.१९**



महानगरपालिकेच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. मागील निवडणुकीमध्ये महापालिका हद्दीमध्ये ६०. २६ टक्के मतदान झाले होते. आता १०० टक्के मतदान करण्यासाठी विविध उपयोजना करण्यात येत असून या पार्श्वभूमीवर महिला बचत गटाची बैठक होऊन सदस्यांमार्फत घरोघरी जाऊन नागरिकांमध्ये मतदान करण्यासाठी जनजागृती केली जाणार आहे.

शहरांमध्ये मतदान जनजागृती साठी संकल्प रथयात्रा सुरू करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त डॉ.पंकज जावळे यांनी दिली. महापालिकेच्या वतीने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिला बचत गटाच्या बैठकीत आयुक्त डॉ. जावळे यांनी मार्गदर्शन केले यावेळी उपायुक्त सपना वसावा, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजान, सुप्रिया घोगरे, निलेश शिंदे, नानासाहेब बेलेकर, आदीसह बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मनपाच्या वतीने लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी जोरदार तयारी सुरू असून विविध संघटनेच्या माध्यमातून शहरांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी संकल्प रथयात्रा सुरू केले आहे. याचबरोबर ज्येष्ठ नागरिक व अपंगांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी सोय केली आहे. त्याचबरोबर महिला बचत गटांना लोकशाही दूत ओळखपत्र देण्यात येणार असून त्यांच्यामार्फत घरोघरी जाऊन मतदान करण्याबाबत जनजागृती करण्यात येईल. आज महिला बचत गटातील सदस्यांना १०० टक्के मतदान करण्यासाठी शपथ दिली. अशी माहिती उपायुक्त सपना वसावा यांनी दिली.

# भगवान महावीरांची शिकवण द्वेष, कटुता नष्ट करणारी-सुभाष मुथा

**समाचार/नगर-दि.१९**

चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील त्रयोदशीला भगवान महावीर यांचा जन्म झाला. त्यानुसार रविवार दि.२१ एप्रिल रोजी भगवान महावीर जन्मकल्याणक (जयंती) साजरी होत आहे. एक राजकुमार असूनही भगवान महावीर यांनी सत्याच्या शोधात आपले सारे काही त्याग केले होते. अनेक वर्ष कठोर तपश्चर्या केल्यानंतर त्यांना सत्याचे आकलन झाले. त्यानंतर त्यांनी जगाला अहिंसा, सत्य आणि शांतीचा संदेश दिला. तसेच जिओ और जिने दो हा मंत्र दिला. त्यांचा हा संदेश अंमलात आणल्यास आपासातील मतभेद, दुही, भांडण, कलह, कटुता, व्देष दूर होऊन सर्वजण स्वत:बरोबरच समाजाची प्रगती साधू शकतात, असे प्रतिपादन कापडबाजार जैन मंदिराचे अध्यक्ष सुभाष मुथा व सकल जैन समाजाने केले आहे.

आजच्या काळात त्यांची शिकवण आचरणात आणल्यास प्रत्येक घरात स्वर्ग निर्माण होईल. अशा भगवान महावीरांचा जन्मकल्याणक साजरा करताना रविवारी नगरमध्ये भव्य शोभायात्रा तसेच विविध कार्यक्रम होणार आहेत. यात सकल जैन समाजाने उत्साहात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

भगवान महावीरांच्या शिकवणुकीत अहिंसा हा सर्वात मोठा धर्म आहे. जो सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना करतो, असे म्हटले आहे. स्वतःवर विजय मिळवणे हे लाखो शत्रूंवर विजय मिळवण्यासारखे आहे. खरा शत्रू तुमच्या आतच राहतो. तो शत्रू म्हणजे क्रोध,अभिमान आणि लोभ.त्याला आतून काढून टाका. तुमच्या आत्म्यापलीकडे कोणताही शत्रू नाही. एखाद्याचे अस्तित्व नष्ट करण्याऐवजी त्याला शांततेत जगू द्या आणि समाधानात जगू द्या, तरच तुमचे कल्याण होईल. स्वत:शी लढा, बाहेरील शत्रूशी काय लढायचे ते सहज साध्य आहे. जे तुम्हाला स्वतःसाठी करायला आवडत नाही ते तुम्ही इतरांसाठी कधीही करू नये. माणूस हा त्याच्या विचारांनी बनलेला प्राणी आहे, तो जे काही विचार करतो, तो बनतो. आत्म्याची सर्वात मोठी चूक म्हणजे आपल्या वास्तविक रूपाला न ओळखणे आणि हे स्वत:ला जाणून घेऊनच नीट केलं जाऊ शकतं. अशी महान आणि प्रत्येकाने आत्मसात करावी अशी शिकवण त्यांनी दिली.

या शिकवणुकीनुसार प्रत्येकाने आचरण करणे आताच्या काळात अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी त्यांच्या जन्मकल्याणक सारखा दुसरा पवित्र मुहूर्त नाही. सकल जैन समाज दरवर्षी नगरमध्ये भगवान महावीर जन्मकल्याणक उत्साहात साजरा करतो. यंदाही भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यात सकल जैन समाजाने सहकुटुंब सहभागी होणे गरजेचे आहे. त्यामुळे नव्या पिढीपर्यंतही भगवान महावीर यांचे महान तत्वज्ञान, संस्कार रूजण्यास मदत होईल, असेही सुभाष मुथा यांनी म्हटले आहे.

# सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उन्हाळी शिबीर

**समाचार/नगर-दि.१९**



सध्याचे युग हे कॉम्प्युटर मोबाईलच्या जमान्याचे आहे. मुलांमध्ये मैदानी खेळ, संस्कार या गोष्टींचा अभाव निर्माण झाला आहे. शाळा, ट्युशन, अभ्यास यामुळे विद्यार्थ्यांचे एक प्रकारे यांत्रिकीकरण झाले आहे. सध्या बच्चे कंपनीची शाळेची सुट्टी सुरू झाली आहे. ही सुट्टी मजेत आणि मुलांच्या आवडीच्या गोष्टी करण्यासाठी संस्कारांचे जतन करण्यासाठी विद्यालयात उन्हाळी शिबिराचे आयोजन केले आहे. या उन्हाळी शिबिरात मुलांचा बौद्धिक, शारीरिक, विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना देखील वाव देण्यासाठी विद्यालयात नेहमीच वेगवेगळे आणि हटके असे उपक्रम राबवले जातात .या अनुषंगाने या शिबिरात देखील असेच हटके उपक्रम राबवले जाणार आहेत. पहिल्या दिवशी सर्व मुलांना चॉकलेट आणि फुगे देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले तसेच संस्कार वर्गात वेगवेगळे श्लोक गणपती, शंकराचे, देवीचे स्तवन यासारखे श्लोक घेण्यात आले. दयाळू आणि प्रेमळ अशा शिबिराजाची गोष्ट मुलांना सांगण्यात आली मुलांनी बम बम बोले या गाण्यावरती नृत्याचा आनंद देखील घेतला ' हम राही है, हम साथी है हम वीर शिपाई है। या गाण्या मध्ये गुंग झाले तसेच मुलांना चार्ट पेपर पासून लॉलीपॉप चे फुले तयार करण्यास शिकवले. हे शिबिर एकूण दहा दिवस चालणार आहे. यामध्ये ट्रेकिंग, घोड्यावरून सफारी, जादूचे प्रयोग, फॅशन शो, थ्रीडी शो, पालकांसाठी वेगवेगळ्या स्पर्धे चे आयोजन केले आहे. हे बालगोपाळ संकेत फार्म येथे सहलीला जाणार आहे. यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या राधिका जेऊरकर समन्वयक अंजना पंडित विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# नैसर्गिक नियमांवर आधारलेली होमिओपॅथी सर्व व्याधींपासून मुक्त करते- डॉ. नरुटे



**समाचार/नगर-दि.१९**

नैसर्गिक नियमांवर आधारलेली होमिओपॅथी चिकित्सा रूग्णांना सर्व व्याधींपासून मुक्त करते, असे प्रतिपादन संवेदना होमिओपॅथीक क्लिनिकचे संचालक डॉ. सोमेश्वर नरूटे यांनी केले.

डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांच्या जयंती निमित्त येथील जुना बाजारमधील संवेदना होमिओपॅथीक क्लिनिकमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. मिलिंद चवंडके आणि बापू आष्टीकर यांच्या हस्ते डॉ.सॅम्युअल हॅनेमन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

डॉ. नरूटे पुढे म्हणाले, विविध भाषांमध्ये निष्णात असलेले डॉ. हॅनेमन यांनी ॲलोपॅथीक एम.डी.ची पदवी घेतली. ॲलोपॅथीक औषधांनी रूग्ण पूर्णपणे बरा होत नाही. मात्र त्याला औषधांच्या दुष्परिणामांचा सामना करावा लागतो, ही वस्तुस्थिती पाहून डॉ. हॅनेमन अस्वस्थ झाले. त्यांनी लगेचच वैद्यकीय सेवा थांबवण्याचा निर्णय घेतला. निरंतर अभ्यास आणि संशोधनातून नैसर्गिक तत्वांवर आधारलेली आणि रूग्णांचे आजार मुळापासून घालवणारी प्रभावी होमिओपॅथी शोधून काढली. डॉ. हॅनेमन यांनी वैद्यकीय क्षेत्राबरोबरच रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, भौतिकविज्ञान शास्त्र, कला, तत्वज्ञान या क्षेत्रांमध्येही कौतुकास्पद योगदान देण्याची कामगिरी बजावली. होमिओपॅथीच्या गोड गोळ्यांनी कॅन्सरसारखा आजारही पळवून लावता येतो, हे सिध्द केले आहे. होमिओपॅथी सर्व व्याधींपासून रूग्णास पूर्णपणे बरे करते.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमधून ताण-तणाव, पोटाचे विकार, त्वचा विकार, मेंदू विकार वाढत चालले आहेत. या सर्व विकारांवर होमिओपॅथी अत्यंत प्रभावीपणे काम करते. तेही कोणतेही दुष्परिणाम न होवू देता, असे डॉ.नरूटे यांनी सांगितले. यावेळी मिलिंद चवंडके, बापू आष्टीकर, दिलीप अडगटला, एकनाथ सोळके, शर्मिला नरूटे, सिमा निमसे, डॉ. अक्षदा गुंड, डॉ. संकेत राठोड, डॉ. गौरव धनगर यांनी मनोगत व्यक्त करताना होमिओपॅथी औषधांचे आलेले स्वानुभव कथन केले.

याप्रसंगी डॉ. अक्षय येणारे, डॉ. सारंग अर्थेकर, डॉ. श्रध्दा गांगर्डे, डॉ. पूजा कदम, प्रियांका नामदे उपस्थित होते.

## अस्सल देवगड, रत्नागिरी हापूसमुळे आमरसाच्या मेजवानीचा गोडवा- गांधी

# जय आनंद महावीर मँगो हाऊस येथे आंबे विक्रीचा शुभारंभ

**समाचार/नगर-दि.१९**



कडाक्याच्या उन्हाळ्यात आमरसाचा आस्वाद घेणे सर्वांनाच आवडते. त्यातही कोकणातील अस्सल देवगड, रत्नागिरी हापूस असतील तर आमरसाच्या मेजवानीला बहार येते. नगरमध्ये गेल्या चार पाच वर्षांपासून असे अस्सल हापूस जय आनंद महावीर मँगो हाऊस उपलब्ध करून देत आहे. अतिशय रास्त दर, दर्जेदारपणा आणि आपुलकीची सेवा यामुळे येथून आंबा खरेदी केल्यावर आमरसाचा गोडवा आणखी वाढतो, असे प्रतिपादन सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन संतोष गांधी यांनी केले.

नगर अर्बन बँक रोडवरील जय आनंद महावीर मँगो हाऊसच्या यंदाच्या सिझनचा शुभारंभ टॅक्स कन्स्लटंट रमेश भळगट यांच्या हस्ते झाला. जय आनंद महावीर युवक मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, उद्योजक मोहनलाल गांधी, संजय बोरा, सुनिल खंडेलवाल, स्वाती गांधी, मँगो हाऊसचे संचालक नितीन मुनोत, दीपाली मुनोत उपस्थित होते.

मोहनलाल गांधी म्हणाले, रत्नागिरी म्हणून रत्नागिरीचेच, देवगड म्हणून देवगडचेच आंबे मिळतात. माफक नफा ठेवून ते व्यवसाय करतात हे त्यांचे वैशिष्ट्ये आहे. यावर्षीही त्यांच्या आंब्याचा दरवळ नगरकरांना आकर्षित करेल, असा विश्वास आहे.

आनंद मुथा म्हणाले, नैसर्गिकरित्या पिकवलेल्या देवगड, रत्नागिरी हापूसचे माहेरघर म्हणून मुनोत यांच्या मँगो हाऊसची ओळख झाली आहे.

नितीन मुनोत म्हणाले की, आंब्याचा मोसम सुरु होताच आम्ही कोकाणात देवगड, रत्नागिरी, पावस येथे जाऊन पारखून आंबा खरेदी करतो. ग्राहकांना सतत सर्वोत्तम द्यायचे हे ब्रीद कायम जपले आहे. त्यामुळे मागील चार पाच वर्षांपासून आम्हाला ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. यंदाही ओरिजिनल रत्नागिरी, देवगड हापूस उपलब्ध झाला असून लालबाग आंबाही लवकरच दाखल होईल. दीपाली मुनोत यांनी आभार मानले.


तारकपूर येथील हॉस्पिटलसाठी
**पाहिजेत**
१) सिस्टर्स - ANM/GNM- २
२) रिसेप्शनिस्ट - लेडिज -१
३) सोनोग्राफी टायपिस्ट - १
४) मावशी - २
संपर्क :- 0241-2323211
9403820779

**विकणे आहे**
गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १000 स्क्वे. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.
-: संपर्क :-
9011923939

**दुकानांचे शटर विकणे आहे**
उत्तम कंडिशनमधील जाड १८ गेज पत्र्याचे ३ शटर विकणे आहे. साईज १०X९ फूट, १०X८ फूट, १०X८ फूट, **किंमत : ३३000/-**
- संपर्क -
नितीन मारवाडी :- 9766788288

**आधार रुग्णसेवा**
आमच्याकडे अपंग, अर्धांगवायू असलेले, अतिवृद्ध अशा आजी, आजोबांसाठी त्यांच्या नर्सिंग केअरसाठी स्टाफ त्वरित उपलब्ध
- संपर्क -
9420205564
9922157008

**विकणे आहे**
नागरदेवळे फाटा, हराळे मळा येथील यलो झोनमधील २० गुंठे जमीन विकणे आहे.
-: संपर्क :-
9226310730

**नवीन रो-बंगले विकणे**
बोल्हेगाव येथे सर्व सुविधांयुक्त उत्तम लोकेशन व क्वॉलिटीचे सलग ३ नवीन रो-बंगले विकणे आहेत.
-किंमत-
1 RK रू.१७.५० लाख
1 BHK रू.२५.५० लाख
एजंट/ब्रोकर स्वागतार्ह
-: संपर्क :-
9273448462


**जाहीर नोटीस**

या नोटिसीद्वारे जाहीर करण्यात येते की, १) कांता भीम कांबळे, २) रवींद्र भीम कांबळे, ३) राजेंद्र भीम कांबळे, ४) किशोर भीम कांबळे, ५) संतोष भीम कांबळे, ६) कृष्णा किरण कांबळे, राहणार घर नं. १२०३, पंचशिलनगर, भिंगार, अ. नगर यांनी घर नं. १२०३ सर्व्हे नं. २११-१२४२, भिंगार अहमदनगर छावणी परिषद हे (१) रजिस्टर खरेदीखत नं. ११०२ दिनांक १३/११/१९९२ (२) रजिस्टर प्रतिज्ञापत्र नं. ६५१३ दिनांक १८/०३/२०२१ च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होण्यासाठी या कार्यालयाकडे रितसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.


सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी, हक्क, हितसंबंध असेल, अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांच्याकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

घ. नं. १२०३, भिंगार
क्षेत्रफळ १३२.०० चौ. फूट

**कार्यालय अधीक्षक,**
**कृते मुख्य अधिशासी अधिकारी,**
**अहमदनगर छावणी परिषद**
**(विक्रांत मोरे)**


**परवडणाऱ्या भाड्यात मोक्याची जागा**
होलसेल औषध विक्री, क्लिनिक, पंचकर्म केंद्र, रुग्ण सेवा केंद्र, सी. ए., शेअर गुंतवणूक यांचे व्यावसायिक कार्यालय, स्पर्धा परीक्षा केंद्र, विविध डेपो, गोडावून तसेच राहण्यासाठी चौकात जागा उपलब्ध
पत्ता : शहीद कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी मार्ग, जुना मंगळवार बाजार, अहमदनगर
- संपर्क -
7770027505
9561604378

**SASE DCORATERS**

Mandap, Light & Flower Decoraters
Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**

वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)
**स्नेहदीप केंद्र**
केडगाव, अहमदनगर
9011020176, 9011026483, 7499980845


टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दिनांक - १९ एप्रिल ते २५ एप्रिल २०२४


| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM 11.10 AM 02.15 PM 07.00 PM 11.00 PM |
| मैदान | 8.30 AM,12.00 PM 6.45 PM,10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 03.25 PM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 01.25 PM 10.30 PM |
| राजकारण गेलं मिशीत | 04.00 PM |
| द लिगसी ऑफ जिनेश्वर | 10.00 AM 07.40 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
AVAILABLE ON book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
**सेक्स समस्या**
वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान
कमजोरी / शुक्राणूंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य
**डॉ. अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहमदनगर
संपर्क: 94 22 23 90 13 ■ www.sextreatment.in

UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
UNITED PHARMA
9049934444
7972378081
9822020649


Domestic
Heat Pump Water Heater
अखंडित गरम पाण्यासाठीचा सोपा मार्ग
१७ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत
आदित्य एंटरप्राईजेस
गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर
मोबाईल नं. : ९३२५१०३७८१